सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -३६२५/ प्र.क्र.११५/ ई-१४६९००२/पोल-३, दि.०८/०१/२०२६

**विषय**:- सीसीटीव्ही संदर्भात सर्वसमावेशक धोरण निश्रित करण्याकरिता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/ प्र.क्र.११५/ई-१४६९००२/पोल-३, दि.०८/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१०८१७०१३६०८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 09-01-2026 17:50:52

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, का.क्र. १७/२१

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (विशा) ,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

सीसीटीव्ही संदर्भात सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२५/ प्र.क्र.११५/ई-१४६९००२/पोल-३.**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.**
**दिनांक : ८.१.२०२६.**

**वाचा :** (१) शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६२३/प्र.क्र.१२१/पोल-३, दि.२५.१.२०२४
(२) शासन पत्र क्र.सीसीटी ३६२५/प्र.क्र.११५/पोल-३, दि.११.९.२०२५
(३) शासन पत्र क्र.सीसीटी ३६२५/प्र.क्र.११५/पोल-३, दि.२७.११.२०२५

**प्रस्तावना :**

राज्यात कायदा व सुवव्यस्थेच्या दृष्टीने तसेच, नियोजन व देखरेख करण्याकरिता वेगवेगळ्या शहरामध्ये काही यंत्रणाकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतात. सीसीटीव्हीचा वापर विविध शासकीय कार्यालयात, विविध गृहनिर्माण संस्थांकडून, विविध दुकाने, मॉल, थिएटर, खाजगी मालमत्ता, सागरी सुरक्षा व्यवस्था अशा अनेक ठिकाणांवर करण्यात येत असतो. तसेच, काही नागरिकांकडून सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात येते. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये विधानमंडळात झालेल्या चर्चेनुसार सीसीटीव्ही संदर्भात सर्वसमावेशक धोरण करण्याचे निश्चित झाले आहे. सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही विविध विभागांकडून वेगवेगळ्या योजनांमधून करण्यात येते. सदर बाबी विविध विभागांशी संबंधित असल्याने राज्यात कॅमेरे व इतर साहित्यांचे स्पेसिफिकेशन, देखभाल व दुरूस्ती व यासंदर्भातील अंमलबजावणी यामध्ये एकसारखेपणा यावा. तसेच, कायदा व सुव्यवस्था व न्यायालयीन प्रकरणाकरिता सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देण्यासंदर्भात कार्यपध्दती ठरविण्याकरिता सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याकरिता मा. मुख्यसचिव

यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांचा समावेश असलेली समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात सीसीटीव्ही कॅमेरे व इतर साहित्यांचे स्पेसिफिकेशन, त्यांची देखभाल व दुरूस्ती व यासंदर्भातील अंमलबजावणी यामध्ये एकसारखेपणा यावा. तसेच, कायदा व सुव्यवस्था व न्यायालयीन प्रकरणाकरिता सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देण्यासंदर्भात कार्यपध्दती ठरविण्याकरिता सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याकरिता मा. मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | समिती सदस्याचा तपशिल | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२. | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५ | मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव (ग्रामविकास), महाराष्ट्र राज्य, मंत्रायल, मुंबई | सदस्य |
| ७ | सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग | सदस्य सचिव |

तसेच, समितीच्या आवश्यकतेनुसार अन्य विभागातील सचिवांना अथवा अधिकाऱ्यांना निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीस आमंत्रित करता येईल.

२. सीसीटीव्ही संदर्भात सर्वसमावेशक धोरण निश्चित करणे, ही सदर समितीची कार्यकक्षा असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१०८१७०१३६०८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.01.08 17:03:37 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (नगरविकास) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, म.रा. मुंबई यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, (परिवहन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११.महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा.
१५.अर्थसं-१/गृह विभाग, मुंबई.
१६.रोख शाखा/गृह विभाग, मुंबई.
१७.निवडनस्ती, पोल-३.

*******